



# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ४९० गुरूवार दि १५ ऑक्टोंबर २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये


# महायुतीत निवडणुकीचा पेच सुटेना; मंत्री सामंत घेणार शिंदेंची भेट; अंतिम निर्णय काय होणार....?

**वृत्तसंस्था-मुंबई**

राज्यात निवडणुकीमुळे राजकीय घडामोडींना वेग आला आहे. महाविकास आघाडी, महायुतीने निवडणुकीसाठी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. या निवडणुकीत महायुतीत समन्वयाचा अभाव असल्याचे समोर येत आहे. महायुतीत निवडणुकीचा पेच सुटेना झाला आहे. पुण्याच्या शिक्षक निवडणुकीत अपक्ष उमेदवार सचिन सानप यांना पाठिंबा देण्याबाबत शिंदेंच्या शिवसेनेत कुजबूज सुरू झाली आहे. त्यामुळे शिंदेंच्या शिवसेनेच्या भूमिकेकडे साऱ्यांचं लक्ष लागलं आहे. पुणे पदवीधर, शिक्षकची जागा भाजपला सोडण्यात आली आहे. यामुळे शिंदे गटात नाराजी असल्याचा दावा करण्यात येत आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यानंतर एकनाथ शिंदेंनी पदाधिकाऱ्यांना युतीधर्म पाळण्याच्या सूचना दिल्या. शिंदे गटाचे पदाधिकारी हे अपक्ष उमेदवार सचिन सानप यांना पाठिंबा देण्याची मागणी करत आहेत. तर सचिन सानप देखील शिंदे गटाच्या पाठिंब्यासाठी प्रयत्न करत आहेत. शिवसेनेकडून पुण्याची जबाबदारी देण्यात आलेले मंत्री उदय सामंत हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेची ११.३० वाजता भेट घेणार असल्याची माहिती आहे. अपक्ष उमेदवार सचिन सानप यांना पाठिंबा देण्याबाबत शिवसेनेत कुजबूज सुरू आहे. एकनाथ शिंदे यांच्याकडून युतीधर्म पाळण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शिक्षक, पदवीधर निवडणुकीत भाजप शिवसेना आणि राष्ट्रवादी या तीनही पक्षात समन्वयाचा अभाव असल्याची चर्चा आहे. सचिन सानप यांनी सर्व राजकीय पक्षांना पाठिंब्यासाठी आवाहन केलं होतं. त्यांनी म्हटलं होतं की, ङ्गमी सगळ्याच राजकीय पक्षांनी पाठिंब्यासाठी विनंती केली आहे. एकनाथ शिंदे यांनाही पाठिंब्यासाठी विनंती केली आहे. मी अपक्ष म्हणून रिंगणात उतरलो आहे. खरंतर शिक्षकांचा



आमदार हा शिक्षक असला पाहिजे. त्याला शिक्षकांचे प्रश्न कळले पाहिजे. या आमदाराला शिक्षकांच्या प्रश्नांची जाण असली पाहिजे. ही भूमिका घेतली आहे. त्यामुळे मला शिंदेंनी पाठिंबा द्यावा. ते माझ्याबाबत सकारात्मक विचार करतील. मी त्यांच्या निर्णायाची वाट पाहतोय. मी अपक्ष निवडणूक लढत आहे. माझ्यासाठी सर्व शिक्षक प्राध्यापक संघटनांनी जोराने तयारी सुरू केली आहे

# तुकाराम मुंढे यांचे नाव घेत रोहित पवार यांचा MPSC आयोगाला मोठा इशारा...

**वृत्तसंस्था-मुंबई**

आयोगातील कथित गैरप्रकारांवरून आमदार रोहित पवार यांनी आयोगाला पुन्हा मोठा इशारा दिला आहे. आंदोलन स्थगित झालं म्हणजे प्रकरण संपलं असं समजू नये, पेपरफुटीतील दोषींना सोडणार नाही, असं त्यांनी म्हटलं आहे. अकरा दिवस विद्यार्थ्यांसोबत आंदोलन करताना रोहित पवार दिसले. कडून जुनी कागदपत्रं नष्ट करण्याची घाई का, असा सवाल करत त्यांनी निर्णयावर आक्षेप घेतला. न्यायिक चौकशी पूर्ण होईपर्यंत जुनी कागदपत्रं नष्ट करण्यास स्थगिती देण्याची मागणी रोहित पवार यांनी केली आहे. रोहित पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली. रोहित पवार यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले की, आयोगातील महाभागांनी जास्त हुशारी करण्याचा प्रयत्नच करू नये. आंदोलन स्थगित झालं म्हणजे सर्व शांत झालं आणि आमचं लक्ष नाही, असं कुणीही समजू नये. पेपर फोडून विद्यार्थ्यांच्या भविष्याची होळी करणाऱ्या कुणालाच आम्ही सोडणार नाही. चौकशी होऊद्या, पेपर फोडणारे सगळे घरी जातीलच.. ला जुनी कागदपत्रे रद्दी काढून नष्ट करण्याची एवढी घाई का झाली आहे? एवढा चक्रमपणा का? न्यायिक चौकशी आयोगाचा आणि तुकाराम मुंडेंच्या धाकाचा हा परिणाम आहे का? आयोगाचं संपूर्ण शुद्धीकरण करायचं असेल तर सर्व जुनी कागदपत्रं देखील तपासणं गरजेचं आहे, तरच सत्य बाहेर येईल. त्यामुळं आयोगाच्या सचिवांनी किंवा सरकारने तत्काळ दखल घेऊन चौकशी पूर्ण होईपर्यंत रद्दी नष्ट करण्याच्या या निर्णयाला स्थगिती देण्याच्या सूचना द्याव्यात, असे रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले. रोहित पवार पुन्हा



आक्रमक भूमिका घेत आहेत. रोहित पवारांच्या आंदोलनाला मोठे यश आले. तुकाराम मुंढे चौकशी समितीमध्ये आहेत. एमपीएससीचे आयुक्त भीमनवार रजेवर गेले आहेत. त्यांनी स्वत: सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत स्पष्ट केले की, जोपर्यंत चौकशी होत नाही, तोपर्यंत मी रजेवर जात आहे. सुरूवातीला सांगण्यात आले की, त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले पण त्यानंतर स्पष्ट झाले की, त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले नाही.

# अभिनेता इम्रान खानवरील कारवाईवरून राजकारण पेटलं

**वृत्तसंस्था-मुंबई**

बॉलिवूड अभिनेता इम्रान खान हा सध्या चर्चेत आला आहे. काही दिवसांपूर्वी त्याने मुंबईतील आंदोलनात सहभाग नोंदवला होता. सध्या देशात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलन सुरू आहे. मुंबईतील याच एका आंदोलनात इम्रान खान सहभागी झाला होता. परंतु अमेरिकेचं नागरिकत्व असलेल्या इम्रान खानला सरकारने मोठा झटका दिला आहे. सरकारच्या एका आदेशाने इम्रान खानला देश सोडून जावे लागणार आहे. यावरून काँग्रेसचे वरिष्ठ नेते नाना पटोले यांनी मोदी सरकावर टीका केली आहे. काँग्रेस नेते नाना पटोले यांनी माध्यमांशी संवाद साधला. नाना पटोले म्हणाले, ङ्ग देशामध्ये देशाच्या जनतेलाइम्रान खान नव्हेच, जो कोणी सरकारच्या विरोधात बोलेल. तो देशद्रोही राहील, अशी भूमिका सरकारमध्ये बसलेल्या लोकांची झाली आहे. देशद्रोही म्हणजे कोण, देशातील ३२ कोटी लोकांची नावे हेतपूर्वक जाती-धर्मांच्या आधारे एसआयआरच्या माध्यमातून मतदार यादीतून काढली जात आहेत. लोकांचे व्यक्तीस्वातंत्र, मतांचा अधिकार हिरावले जात आहेत. जे संविधान मानत नाही, असे लोक सरकारमध्ये बसले आहेत. अशा लोकांना तुम्ही देशद्रोही म्हणायचं का? आता आंदोलन करायचं असेल. त्याला आता पैसे भरावे लागतात. आता सरकारच्या विरोधात बोलायचं असेल, तर तुम्हाला पैसे भरावे लागणार आह ही कुठली लोकशाही आहे. स्वातंत्र्य भारतात देशात प्रत्येक नागरिकांना मत मांडण्याचा अधिकार नसेल, तर भारतात हुकूमशाही चालवण्याचं काम सुरू आहे. देशात ३२ कोटी लोकांची नावे वगळून एक प्रकारने सरकारने देशद्रोह केला आहे

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# निर्मितीचे डोहळेफलागलेले लाखो हात!



एखादा विषय सुचल्यानंतर वा लिहावं असं वाटल्यानंतर लिहून मोकळे होणारे किती लोक असतात? नेमका आकडा सांगता येणार नाही; पण अशा लिहित्या हातांना डिजिटल तंत्रज्ञानानं ङ्गब्लॉगफ्नामक व्यासपीठ उपलब्ध करून दिलं, त्यालाही अडीच दशकांहून अधिक काळ उलटून गेला आहे. या व्यासपीठाची व्याप्ती इतकी वाढली आहे, की डिजिटल तंत्रोद्योगाच्या आकडेवारीनुसार, दररोज तब्बल ७५ लाख ब्लॉग लिहिले जातात किंवा व्हिडिओच्या स्वरूपात सादर केले जातात. आणि असे ब्लॉग वा व्ह्लॉग (व्हिडिओ ब्लॉग) करणाऱ्यांची (ब्लॉगर) संख्याही विस्मयकारक अशीच आहे. जगभरात साठ कोटींहून अधिक लोक ब्लॉगिंग करतात. त्यांपैकी वीस कोटी सक्रिय आहेत; याचा अर्थ ते महिन्यातून एकदा किंवा दोनदा लेखनाद्वारे वा व्हिडिओद्वारे व्यक्त होतात. आज इंटरनेटवर सुमारे दोन अब्ज वेबसाइट आहेत; त्यांपैकी एक तृतीयांश साइट ब्लॉगरनी व्यापलेल्या आहेत. इंग्लिश ही जगात सर्वाधिक देशांत बोलली जाणारी आणि बहुतेक सर्व व्यवहारांत वापरली जाणारी भाषा. त्यामुळे ब्लॉगिंगच्या जगतात इंग्लिशचा वरचष्मा असणं स्वाभाविक. एकूण ब्लॉग पोस्टपैकी तब्बल ४0 टक्के पोस्ट या इंग्लिश भाषेतून असतात. उर्वरित साठ टक्क्यांत वरच्या क्रमांकावरील भाषा आहेत, स्पॅनिश, फ्रेंच, इटालियन, मंडरीन (चिनी) आणि जर्मन. या भाषांमधील पोस्टचे एकत्रित प्रमाण ४0 टक्के आहे. उर्वरित वीस टक्क्यांत इतर भाषा येतात. भारतीय भाषांत हिंदी, तमिळ, तेलुगू, बंगाली, मराठी, गुजराती, कन्नड असा क्रम लागतो. वाचणारे कमी असल्याची तक्रार सध्या मोठ्या प्रमाणावर केली जाते. ती तक्रार अगदीच चुकीची नाही; परंतु व्हिडिओ ब्लॉगच्या किंवा रील्सच्या (३0 टक्के) तुलनेत लिखित ब्लॉगचे (७0 टक्के) प्रमाण आजही खूप मोठे आहे. भारतात हे प्रमाण किंचित वेगळे म्हणजे ४0:६0 असे आहे. ब्लॉग लिहिले जातात, ते ङ्गटम्बलरफ, ङ्गवर्डप्रेसफ यांसारख्या आशय व्यवस्थापन यंत्रणेच्या (सीएमएस) साह्यानं. कोडिंग किंवा अन्य तांत्रिक कौशल्ये न वापरता या वेबसाइटवरून ब्लॉगिंग पेज तयार करता येते. ङ्गवर्डप्रेसफ हे जगातील सर्वांत मोठे ब्लॉगिंग प्लॅटफॉर्म; तिथे दीर्घ लेखन करता येते. त्यामुळे तिथं व्यक्त होण्याला शब्दांची मर्यादा नाही. या तुलनेत ङ्गटम्बलरफ हा मायक्रो ब्लॉगिंग प्लॅटफॉर्म. तिथे संक्षिप्तपणे व्यक्त होता येते. याखेरीज ङ्गब्लॉगरफ, ङ्गमीडियमम, ङ्गघोस्टफ, ङ्गसबस्टॅकफ, ङ्गविक्सफ यांसारखे प्लॅटफॉर्महीआहेत. मात्र, सर्वाधिक वापर केला जाणारा प्लॅटफॉर्म आहे, ङ्गटम्बलरफ. एकूण ब्लॉगपैकी निम्मे लेखन या प्लॅटफॉर्मवरून केले जाते. त्यानंतर ङ्गवर्डप्रेसफ्चा क्रमांक लागतो. व्हिडिओच्या बाबतीत ङ्गयू ट्यूबफ, ङ्गइन्स्टाग्रामम, ङ्गफेसबुकफ, ङ्गटिकटॉकफ ही व्यासपीठं लोकप्रिय आहेत. ब्लॉगरची सर्वाधिक संख्या आहे, ती अमेरिकेत. वास्तविक ही संख्या नेमकेपणाने मोजणारी यंत्रणा नाही; परंतु दररोज अपलोड केल्या जाणाऱ्या पोस्टवरून त्याचा अंदाज करता येतो. अमेरिकेत साधारणतः सव्वा तीन कोटी, चीनमध्ये एक ते दीड कोटी, तर भारतात तीस लाख ते पन्नास लाख ब्लॉगर असावेत, असा अंदाज आहे. ब्रिटन, जर्मनी, स्पेन, ब्राझील, जपान, इंडोनेशिया इथंही ब्लॉगरची संख्या लक्षणीय आहे. ब्लॉगिंग करणाऱ्यांत तरुण आणि मध्यमवयीन मोठ्या संख्येनं आहेत. २१ ते ३५ वर्षे या वयोगटातील ब्लॉगरचे प्रमाण निम्मे (५0 ते ५५ टक्के), तर ३६ ते ५0 वर्षे या वयोगटातील ब्लॉगरचे प्रमाण २५ टक्के आहे. थोडक्यात, एकूण ब्लॉगरपैकी ७५ टक्के ब्लॉगर २१ ते ५0 वर्षे या वयोगटातील आहेत. या सर्वांचे विषय वेगवेगळे असले, तरी जीवनशैली, करमणूक, तंत्रज्ञान, आरोग्य, फिटनेस, खाद्यपदार्थ, पालकत्व, फॅशन, शिक्षण, करिअर, पुस्तकं अशा अनेक क्षेत्रांवर ते व्यक्त होत असतात. या विषयांवर कोट्यवधी लोक व्यक्त होत आहेत. कविवर्य बा. भ. बोरकर यांचे शब्द उसने घेऊन म्हणायचे झाल्यास ङ्गनिर्मितीचे डोहळेफ लागलेल्या या कोट्यवधी लिहित्या हातांद्वारे दररोज तब्बल ७५ लाख आशय (लिखित किंवा व्हिडिओ) तयार केले जातात आणि अब्जावधी लोक ते वाचतात किंवा पाहतात. आशय निर्मितीचे हे लोकशाहीकरणच म्हणायला हवे. आशयात अर्थातच वैविध्य असते; त्याचबरोबर काहींच्या लेखनात एकारलेपणाही असतो. मात्र, वाचणाऱ्यांना किंवा पाहणाऱ्यांना निवडीचे स्वातंत्र्य आहे. संबंधित प्लॅटफॉर्म आपल्या प्रणालीद्वारे या स्वातंत्र्याचा संकोच करीत असतो; म्हणजे आपण काय पाहावं आणि वाचावं हे नियंत्रित करीत असतो; परंतु अमुक वाचणं/पाहणं किंवा न वाचणं/पाहणं हे ठरवण्याचं स्वातंत्र्य अर्थातच आपल्याला आहे; नाही का?




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

## आरोग्य संस्थांना जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांची अचानक भेट; कर्मचाऱ्यांना मुख्यालयी उपस्थितीचे निर्देश

जनसंचलन-बुलढाणा

जिल्ह्यातील नागरिकांना दर्जेदार व वेळेवर आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले यांनी आज आयुष्मान आरोग्य मंदिर, पाडळी तसेच उपकेंद्र दहीत बुद्रुक येथे अचानक भेट देऊन आरोग्य सेवांचा आढावा घेतला. या भेटीदरम्यान त्यांनी आरोग्य संस्थांमधील उपलब्ध आरोग्य सुविधा, औषधसाठा, स्वच्छता व्यवस्था तसेच विविध अभिलेखांची तपासणी केली. आरोग्य सेवांच्या अंमलबजावणीचा आढावा घेत आवश्यक त्या सूचना संबंधित कर्मचाऱ्यांना दिल्या. आरोग्य कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी नियमित उपस्थित राहून नागरिकांना वेळेवर व दर्जे दार आरोग्य सेवा उपलब्ध करून द्याव्यात. आरोग्य सेवांमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई होऊ नये, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश डॉ. मंडाले यांनी दिले. तसेच कर्तव्यात कसूर करणाऱ्या व विनापरवानगी गैरहजर



राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सेवा प्रभावीपणे मिळाव्यात, यासाठी आरोग्य संस्थांच्या कामकाजावर नियमित देखरेख ठेवण्यात येत आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने कर्तव्य बजावून आरोग्य विभागाच्या सेवा अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले यांनी केले.

## जगण्याची उमेद कायम पण ३० लाख आणायचे कुठून?



जनसंचलन-देऊळगाव राजा

देऊळगाव राजा वय अवघे ३२ वर्षे कुटुंबासाठी कष्ट करण्याच्या वयात विजय गजानन शिंदे लिव्हरच्या गंभीर आजाराशी झुंज देत आहेत. पाडळी शिंदे येथील या तरुणाला तातडीने लिव्हर प्रत्यारोपणाची गरज असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. मात्र, उपचारांचा २५ ते ३० लाखांचा खर्च उभा करायचा कुठून, या प्रश्नाने कुटुंब हतबल झाले आहे. गेल्या सहा महिन्यांपासून विजय यांच्यावर उपचार सुरू आहेत. नातेवाईकांची मदत आणि उसनवारीतून आतापर्यंत लाखो रुपये खर्च झाले. प्रकृती खालावल्याने डॉक्टरांनी प्रत्यारोपणाचा सल्ला दिल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. शेतीवर उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबाचा प्रमुख आधारच आजारी पडल्याने आर्थिक संकट अधिक गडद झाले आहे. उपचारांसाठी धडपड सुरू आहे; मात्र एवढी मोठी रक्कम जमवताना कुटुंबाच्या मर्यादा आड येत आहेत. दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था आणि लोकप्रतिनिधींनो, विजयच्या मदतीला पुढे या! प्रत्येक छोटी मदत उपचारांचा मार्ग सुकर करू शकते. मदत शक्य नसल्यास आवाहन इतरांपर्यंत पोहोचवावे, अशी विनंती कुटुंबीयांनी केली आहे.




## शोले स्टाईलफटाकीवर चढले भुतेकर; आता अधिकाऱ्यांना खाली उतरून उत्तर द्यावेच लागणार!

### इसरूळमध्ये निकृष्ट कामाचा आरोप; १५ दिवसांची मुदत संपताच टाकीवरून एल्गार!

जनसंचलन/ इसरूळ

ता चिखली, १३ ऑक्टोबर जनतेच्या पैशातून उभारलेल्या पाण्याच्या टाकीच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना प्रशासनाने काय केले? असा थेट सवाल करत युवासेना उपजिल्हाप्रमुख संतोष पाटील भुतेकर यांनी आज इसरूळ येथे ङ्गशोले स्टाईलफ आंदोलन सुरू केले. जलजीवन मिशनच्या टाकीवर सहकाऱ्यांसह बसून त्यांनी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळी येण्याची मागणी केली आहे. टाकीच्या बांधकामात गंभीर त्रुटी असल्याचा भुतेकरांचा आरोप आहे. काम सुरू असतानाच वारंवार सूचना दिल्या; त्रुटींचा व्हिडिओही प्रसारित केला. निवेदनाद्वारे चौकशी आणि कारवाईसाठी १५ दिवसांची मुदत दिल्यानंतरही अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याचा दावा त्यांनी केला. जनतेचा पैसा खर्च होतोय, मग गुणवत्तेशी तडजोड का? असा सवाल उपस्थित करत स्वतंत्र तांत्रिक तपासणीची मागणी करण्यात आली आहे. दोष आढळल्यास अधिकारी, अभियंते आणि ठेकेदाराची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई व वसुली करावी, अशी आंदोलनकर्त्यांची भूमिका आहे. तपासणी पूर्ण होईपर्यंत उर्वरित देयकांबाबत नियमानुसार निर्णय घ्यावा. दुरुस्ती करायची की बांधकामाचा संबंधित भाग नव्याने उभारायचा, हे तांत्रिक अहवालातून स्पष्ट करावे, अशीही मागणी आहे.टाकीवर आंदोलन सुरू आहे; अधिकारी



कधी येणार आणि चौकशीचा ठोस निर्णय कधी होणार?याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. समाधानकारक कार्यवाही होईपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा इशारा भुतेकरांनी दिला.

## दुष्काळामध्ये पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य

जनसंचलन-बुलढाणा

अल निनोच्या प्रभावामुळे तसेच हवामानातील बदलामुळे मान्सूनच्या पावसात मोठी घट झाली आहे, राज्यात सरासरी १३ टक्के पेक्षा जास्त पाऊस कमी पडला आहे. कमी पाऊस व पावसातील खंड यामुळे जलसाठ्यानी आताच तळ गाठला आहे . विदर्भात २३ टक्के तर मराठवाड्यात ४० टक्के सरासरीपेक्षा कमी पावस झाल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सिंचन प्रकल्प तसेच उपलब्ध जलसाठ्याचे काटकसरीने नियोजन करून उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता निश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा प्रशासनाला सक्त सूचना दिल्या आहेत. दिनांक ३१ ऑगस्ट २०२७पर्यंत पिण्याच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात आले आहे. नागपूर विभागातील सर्वच जलसाठ्यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. मोठ्या जलसाठ्यांमध्ये २३ टक्के पेक्षा जास्त घट झाली आहे. यामध्ये नागपूर , नागपूर वर्धा भंडारा चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्यातील जलसाठ्याचा समावेश आहे .मध्यम प्रकल्पामध्ये सुद्धा सरासरी १६ टक्के पेक्षा जास्त जलसाठ्यात मागील वर्षाच्या तुलनेत घट झाल्यामुळे उन्हाळ्यामध्ये पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने तातडीच्या आवश्यक उपाययोजना लागू केल्या आहेत, पिण्याच्या पाण्याची उपलब्ध उपलब्धता अबाधित राहावी तसेच जनावरांना साठी आवश्यक पाण्याची व्यवस्था निश्चित करण्यासाठी सिंचन प्रकल्प निहाय पाण्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे त्यानुसार जिवंत पाणी साठ्यापैकी किमान दहा टक्के साठा आपत्कालीन साठा म्हणून राखून ठेवण्यात येणार आहे. महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात उपलब्ध पाण्याची काटकसरीने वापर करून पाण्याची होणारी गळती थांबवण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली आहे त्यासोबतच भूगर्भातील पाण्याचा साठा सुरक्षित राहावा यासाठी इंधन विहिरीत सारख्या उपयोजना थांबविण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. ग्रामीण भागातही पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणार नाही या दृष्टीने सूक्ष्म नियोजन आला सुरुवात झाली आहे. उपलब्ध जलसाठे सुरक्षित करून पाण्याचे आरक्षणा नुसार नियोजनाला सुरुवात झाली आहे. दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले असून उपलब्ध जलसाठ्यातून ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. यासंदर्भात राज्य शासनाने मार्गदर्शक सूचना लागू केल्या आहेत, यानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली आहे. विविध जलसाठे व सिंचन प्रकल्पात उपलब्ध साठ्यापैकी पिण्याच्या पाण्याचा अग्रक्रमाने वापर करण्यात येणार आहे त्यानंतर औद्योगिक व कृषी क्षेत्राला पाणी देण्यात येईल. औद्योगिक क्षेत्रात पाणी वापरताना सरासरी ३०% पेक्षा जास्त पाण्याचे पुनर्वापर करण्यात यावा तसेच पिण्याच्या पाण्याचा वापर आवर बंधने घालावीत असे निर्देशही देण्यात आले आहेत. सिंचनासाठी पाण्याचा वापर करताना पशुधनासाठी चाऱ्याचा वापर आला प्राधान्य देण्यात यावे तसेच बियाण्याच्या कार्यक्रमासाठी पाण्याचा वापर केल्यानंतरच रब्बी हंगामासाठी उपलब्ध पाणी असल्यास विचार करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील धरणे कालवे नद्या , तलाव व इतर जलस्त्रोतांतून होणाऱ्या अनधिकृत व बेकायदेशीर पाणी उपसा तात्काळ थांबविण्यात येणार आहे यासाठी जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनातर्फे विशेष मोहीम राबवून बेकायदेशीर पाण्याचा वापर करणाऱ्या करणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार आहे. राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे पाण्याचा कुठेही गैरवापर होणार नाही तसेच उपलब्ध होणारे पाणी जपून वापरावे असे आव्हान केले आहे.

# बुलढाणा जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासनाचा दणका!

## २३४ नमुने तपासले, १२ असुरक्षित!

**जनसंचलन बुलढाणा**

जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने एप्रिल २०२६ पासून आतापर्यंत मोठी कारवाई करण्यात आल्याची माहिती अन्न सुरक्षा अधिकारी प्रमोद पाटील यांनी दिली.२३४ नमुने तपासले असता १२ असुरक्षित आढळल्याने खळबळ उडाली आहे. सद्यस्थितीत बुलढाणा कार्यालयाकडे तीन अन्न सुरक्षा अधिकारी कार्यरत आहेत. त्यांच्यामार्फत एप्रिल २०२६ पासून आतापर्यंत १०६ परवानाधारक आस्थापनांची तपासणी करण्यात आली आहे, तर १३७ छोट्या व्यावसायिकांची (नोंदणीकृत) तपासणी करण्यात आली आहे. जिल्हाभरातून एकूण २३४ नमुने गोळा करण्यात आले आहेत. त्यापैकी १२ नमुने असुरक्षित आढळले आहेत. एखाद्या अन्नपदार्थात रंगाची मात्रा ठरवून दिलेली असते, त्यापेक्षा जास्त प्रमाणात रंगाचा वापर केलेला असणे. तसेच आईस्क्रीम, मावा या नावाने विकल्या जाणाऱ्या पदार्थात पामतेलाचा वापर केलेला असेल तर तो लोकांच्या आरोग्याच्या हितासाठी असुरक्षित म्हणून घोषित केला आहे. तसेच ८ अन्नपदार्थ कमी दर्जाचे असल्याचे अहवाल प्राप्त झाले आहेत, तर २ अन्नपदार्थ चुकीच्या दर्जाचे/लेबलचे असल्याचे अहवाल प्राप्त झाले आहेत. तपासणी दरम्यान ४ जणांना जागेवरच व्यवसाय थांबवण्याचे निलंबन आदेश दिले होते. काहींना सुधारणा नोटीस देण्यात आली होती. त्याचे पालन न करणाऱ्यांचे परवाने निलंबित केले आहेत. आतापर्यंत एकूण १२ जणांचे नोंदणी प्रमाणपत्र निलंबित करण्यात आले असून, त्यापैकी ३ आस्थापनांनी पूर्तता केल्याने त्यांना पुन्हा व्यवसाय सुरू करण्याची परवानगी देण्यात आली आहे. एकूण ७१ हॉटेल-रेस्टॉरंटची तपासणी करण्यात आली आहे. यामध्ये बुलढाणा शहरातील दोन ठिकाणी अन्नपदार्थात




रंगाचा वापर झाल्याने त्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. त्यापैकी एका रेस्टॉरंटचा परवाना रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. अन्न व्यवसाय चालकांना प्रशासनाने कडक शब्दात सांगितले आहे की, ङ्कङ्कज्या अन्नपदार्थात रंग वापरण्याची गरज नाही, तिथे अजिबात रंग वापरू नका. रंगामुळे कोणतेही पोषणमूल्य मिळत नाही, फक्त पदार्थ दिसायला आकर्षक दिसतो. तसेच नागरिकांनीही हॉटेलवाल्यांना रंग टाकून देऊ नकाङ्कङ्क अशी मागणी करावी. अन्नपदार्थ ताजे असावेत, त्याची बिले असावीत आणि कमी दर्जाचे पदार्थ वापरू नयेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गुजरातमध्ये दडला, चिखली पोलिसांनी गाठला!

**जनसंचलन/ चिखली**

फसवणूक आणि विश्वासघाताच्या गुन्ह्यात पाहिजे असलेल्या आरोपीला चिखली पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने गुजरातमध्ये जाऊन अटक केली. बुलढाणा जिल्ह्यात सुरू असलेल्या विशेष ङ्कफरार व पाहिजे आरोपी शोध मोहिमेफ्अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. मुस्ताकभाई उस्मानभाई कडीवार (वय ४०, रा. लिंबाडा, ता. वाकानेर, जि. मोरबी, गुजरात) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. चिखली पोलीस ठाण्यात २३ जानेवारी २०२५ रोजी दाखल झालेल्या अपराध क्रमांक ७९/२०२५ मध्ये भारतीय दंड संहितेच्या कलम ४०६, ४२० आणि ३४ अन्वये गुन्ह्याची नोंद आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपीला यापूर्वीच अटक करण्यात आली होती. त्यानंतर दुसऱ्या आरोपीला पंढरकवडा येथून पकडण्यात आले. मात्र, तिसरा आरोपी मुस्ताकभाई कडीवार पोलिसांना हवा होता. त्याला अटक करण्यासाठी चिखली डीबी पथक सातत्याने माहिती गोळा करत होते. पोलीस निरीक्षक भूषण गावंडे यांच्या सूचनेनुसार पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांच्या माहितीच्या आधारे शोध सुरू ठेवला. आरोपीचा माग काढत पथक गुजरातमधील वाकानेर परिसरात पोहोचले आणि कडीवारला अटक केली. जिल्ह्याबाहेर गेलेल्या पाहिजे आरोपीचा शोध घेऊन त्याला




पकडण्यात पथकाला यश आले. एका आरोपीच्या अटकेवर न थांबता या गुन्ह्यातील इतर पाहिजे आरोपींचाही शोध घेण्यावर चिखली पोलिसांनी भर दिला. मुख्य आरोपी आणि पंढरकवडा येथून अटक केलेल्या दुसऱ्या आरोपीपाठोपाठ आता तिसऱ्या आरोपीलाही पकडण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणातील आणखी एका पाहिजे आरोपीचा शोध पूर्ण झाला आहे. सातत्याने माहिती संकलन आणि तिच्या आधारे केलेल्या कारवाईचे हे फलित असल्याचे पोलिसांच्या प्रसिद्धिपत्रकातून स्पष्ट होते. पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार यांच्या आदेशानुसार ही मोहीम राबवण्यात आली. पोलीस निरीक्षक भूषण गावंडे यांच्या थेट मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शरद भागवतकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल अमोल गवई, पोलीस कॉन्स्टेबल प्रशांत धंदर, अजय इटावा, राहुल पायघन आणि ज्ञानेश्वर शिंदे यांनी कारवाई केली. गुजरातपर्यंत माग काढून चिखली डीबी पथकाने फरार आरोपीच्या मुसक्या आवळल्या!

# आम्हाला भिकारी समजता का? आम्ही देशाचे अन्नदाते आहोत!

## पाच हजाराची भीक नको, हेक्टरी १ लाख द्या - रविकांत तुपकरांचा सरकारला थेट इशारा

**जनसंचलन बुलढाणा**

एकीकडे जिल्ह्यातील १४४८ गावांतील ७.१८ लाख हेक्टरवरील पीक दुष्काळाने करपल्याचे पंचनामे पूर्ण झाले आहेत, अहवाल दोन दिवसांत शासनाकडे जाणार आहे. दुसरीकडे राज्य सरकारने दिवाळीपूर्वी दुष्काळग्रस्तांच्या खात्यात ५ हजार रुपये टाकण्याची घोषणा करताच शेतकरी अक्षरशः पेटून उठला आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडिओत क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी सरकारला जाब विचारला आहे. दिवाळीपूर्वी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यावर पाच हजार रुपयाची मदत देऊ असं राज्य सरकारनं सांगितलं, ही निव्वळ शेतकऱ्यांची थट्टा आहे. शेतकऱ्यांच्या जखमेवर हा मीठ चोळण्याचा प्रकार आहे. पाच हजार रुपये देता म्हणजे तुम्ही आम्हाला काय भिकारी समजता का? आम्ही काय भिकारी आहोत का?ङ्कङ्क अरे आम्ही देशाचे अन्नदाते आहोत. आम्ही पोशिंदे आहोत. आम्ही नाही केला पेरा तर तुम्ही काय खाल -



धतुरा? आमच्या भरवशावर तुम्ही आहात लक्षात ठेवा. पाच हजार रुपयात काय होणार आहे हो? आम्हाला हेक्टरी खर्च एक लाख रुपये आलेलं आहे. त्यामुळे हेक्टरची मर्यादा न ठेवता प्रतिहेक्टरी एक लाख रुपये नुकसान भरपाई आम्हाला मिळाली पाहिजे, असे तुपकर म्हणाले. रविकांत तुपकर यांनी सरकारला थेट आव्हान दिलं आहे की, पाच हजार रुपयाची मदत आम्ही तुम्हाला देतो, तुम्ही आमच्याकडे येऊन राहा वर्षभरासाठी, त्याच्यात तुम्ही दिवाळी करा. असलं हे थोतांड बंद करा. शेतकऱ्याला जर तुम्ही गृहीत धरण्याचा प्रयत्न करत असाल तर शेतकरी तुम्हाला तुमची जागा दाखवून देईल. हा प्रश्न फक्त एका शेतकऱ्याचा नाही, तर ५ लाख ८६ हजार बाधित खातेदारांचा आक्रोश आहे. पंचनामे पूर्ण होऊनही जर दिवाळीसारख्या सणाला फक्त ५ हजार रुपये हातात पडणार असतील, तर शेतकऱ्याची दिवाळी काळीच होणार आहे. पाच हजाराची मदत मान्य नाही. हेक्टरी १ लाख रुपये नुकसान भरपाई मिळाल्याशिवाय आम्ही थांबणार नाही. प्रचंड मोठं आंदोलन येणाऱ्या काळात या सरकारच्या विरोधात उभं होणार आहे,असेही तुपकर म्हणाले.

# मंदिर पाण्याखाली, पण भाविकांची सेवा थांबली नाही!

**जनसंचलन/ लोणार**

माँ कमळजा देवीचे मूळ मंदिर सरोवराच्या वाढत्या पाणीपातळीमुळे पाण्याखाली गेले असले, तरी भाविकांच्या श्रद्धेचा ओघ कायम आहे. दर्शनासाठी येणाऱ्या हजारो भाविकांची गैरसोय दूर करण्यासाठी लोणार नगर परिषदेने आरओचे शुद्ध, थंड पिण्याचे पाणी आणि फिरत्या शौचालयाची व्यवस्था केली आहे. नगराध्यक्ष सौ. मीराताई भूषण मापारी आणि माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक भूषण पाटील मापारी यांच्या पुढाकारातून सरोवराच्या काठावर या सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. विशेषतः महिला भाविकांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. मूळ मंदिर पाण्याखाली गेल्याने कमळजा माता सेवा संघाने मंदिरालगतच्या खुल्या पटांगणात शेड उभारून देवीची प्रतिमा दर्शनासाठी ठेवली आहे. येथे भाविकांची



मोठी गर्दी होत असून, नवरात्रोत्सव आणि दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर गर्दी आणखी वाढण्याची शक्यता आहे. ही गरज ओळखून नगर परिषदेने तातडीने पावले उचलली. ङ्कस्वच्छ लोणार, सुंदर लोणारफ्वा संदेश देत पाणी आणि स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध केल्याने परिसरातील स्वच्छता राखण्यासही मदत होणार आहे. दर्शनासोबत मूलभूत सुविधांची जोड देणाऱ्या या उपक्रमाचे भाविकांकडून कौतुक होत आहे. भाविकांची अडचण ओळखून केलेली ही व्यवस्था नगर परिषदेच्या संवेदनशीलतेची ठोस प्रचिती देत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८